जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 18/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 15.11.2021

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ''ड'' चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महापौर, सौ. जयश्री निलेश पावडे यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दिनांक 22.11.2021 रोजी सकाळी 11.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

(मा. महापौर यांच्या मान्यतेने)

स्वाक्षरीत/-
(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति
श्री/श्रीमती -------------------------------
सदस्य /सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नगरसचिव कार्यालयाचा प्रस्ताव

विषय क्रं. 01

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20(3) नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे 16 सदस्यापैकी खालील (8) सदस्य दिनांक 01.12.2021 रोजी दुपारी निवृत्त होत आहे.

1) तेहरा अमितसिंह गोपालसिंह, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
2) नेरलकर अपर्णा ऋषिकेश भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
3) रायबोले ज्योती सुभाष, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
4) गड्डम नागनाथ दत्तात्रय, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
5) गजभारे बापुराव नागोराव, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
6) मोरे दिपाली संतोष, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
7) शबाना बेगम मो. नासेर, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
8) इंदुबाई शिवाजीराव घोगरे, भारतीय जनता पार्टी

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20(5) अन्वये नांवामनपाकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या वरील सदस्यांच्या रिक्त (8) जागावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31-अ नुसार नविन (8) सदस्यांची नामनिर्देशानाव्दारे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

टिप:- शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-2010/प्र.क्र.-85/नवि-32 दिनांक 06 जूलै 2010 नुसार विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते, गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर तौलनिक संख्यावळाच्या आधारावर पालिका सदस्याची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौराकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयात, आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

Scanned with CamScanner

## आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव

विषय क्रं. 02

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/7214/21 दि. 12.10.2021 अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-2019/प्र.क्र.30/सेवा-9 दि 07 ऑक्टोंबर 21 नुसार दिनांक 01 जुलै 2021 पासुन 7वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्याचा दर 17 टक्के वरुन 28 टक्के करण्यात यावा सदर महागाई भत्ता वाढ दिनांक 01 ऑक्टोंबर 2021 पासुन रोखीने देण्यात यावी व दिनांक 01 जुलै 2021 ते 30 सप्टेंबर 2021 या तीन महिण्याच्या कालावधीतील थकबाकी बाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असे शासन निर्णयात नमुद आहे.

शासनाने शासकीय कर्मचा-यांना महागाई भत्यात वाढ केल्यानंतर शासन निर्णय नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करण्यात येवुन त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्या यावा असे मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 26 दि. 28.05.2002 अन्वये मनपा सर्वसाधारण सभेने निर्देशित केल्यानुसार महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचा-यांच्या वेतनधारकांना दि. 01 ऑक्टोंबर पासुन मुळ वेतन यावर 28% दराने महागाई भत्ता लागु करण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास मनपा सर्वसाधारण सभेसमोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

विषय क्रं. 03

महानगरपालिकेच्या आगामी निवडणूका बाबत कल्पना देऊन निवडणूक आयोगातर्फे राबविण्यात येणा-या विधानसभा मतदार यादी संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत अवगत करणे.

विषय क्रं. 04

विषय :- मंजूर सुधारीत विकास योजनेमधील आरक्षण क्रं. ए-2, ए-3, ए-4 या आरक्षणामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मंजूर सुधारीत विकास योजनेमध्ये मौ. वजिराबाद मधील स. नं. 60 मधील आरक्षण क्रं. ए-2 ब्युरल ग्राऊंड (0.45 हेक्टर), आरक्षण क्रं. ए-3 क्रिमेशन ग्राऊंड (0.45 हेक्टर), आरक्षण क्रं. ए-4 गार्डन (4.24 हेक्टर) असुन त्यांचे समुचित प्राधिकरण हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड आहे. उक्त आरक्षण क्रं. ए-2 ब्युरल ग्राऊड मधील (240 चौ.मी.), आरक्षण क्रं. ए-3 क्रिमेशन ग्राऊंड मधील (240 चौ.मी.), आरक्षण क्रं. ए-4 गार्डन मधील (27400 चौ.मी.) जागा विकास हस्तांतरणीय हक्क (टिडीआर) अंतर्गत मनपाकडे संपादित झालेली आहे. सदर संपादीत जागेमधील आ. क्रं. ए-4 गार्डनची 1520 चौ.मी. जागा कमी करुन तसेच आ.क्रं. ए-3 ची 240 चौ.मी. जागा कमी करुन ती आरक्षण क्रं. ए-2 मध्ये वाढवून (इंग्रजी एल आकारात) खालील प्रमाणे बदल करणे.

| आरक्षण क्रं. | आरक्षणाचे नांव | मुळ क्षेत्र अंदाजीत | फेरबदल करावयाचे क्षेत्र | TDR खाली हस्तांतरीत जागेच्या क्षेत्रफळामधील बदल |
|---|---|---|---|---|
| ए-2 | ब्युरल ग्राऊंड | 0.45 हेक्टर | 0.626 हेक्टर | 240 + 240 + 1520 = 2000 चौ.मी. |
| ए-3 | क्रिमेशन ग्राऊंड | 0.45 हेक्टर | 0.426 हेक्टर | निरंक |
| ए-4 | गार्डन | 4.24 हेक्टर | 4.088 हेक्टर | 27400 - 1520 = 25880 चौ.मी. |
| | एकूण | 5.14 हेक्टर | 5.14 हेक्टर | 27880 चौ.मी. |

तसेच यापुर्वी टिडीआर अंतर्गत हस्तांतरीत केलेली 32000 चौ.मी. जागा ही महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना घरे यासाठी आरक्षीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेसाठी शासनाकडे दिनांक 31.10.2017 रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापि, त्यास अद्याव पर्यंत मंजूरी मिळालेली नाही. त्या प्रस्तावामधील महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना घरेसाठीच्या क्षेत्रात उपरोक्त प्रमाणे नमूद केलेनुसार 1520 चौ.मी. जागा वगळुन उर्वरीत 25880 चौ.मी.

Scanned with CamScanner

चे क्षेत्र महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना घरेसाठी आरक्षीत करण्यासाठी फेरप्रस्ताव शासनास सादर करणे व आरक्षण क्रं. ए-2, ए-3, ए-4 च्या क्षेत्रफळात वर नमुद केले प्रमाणे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची प्राथमिक मान्यता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 94 दिनांक 30.07.2021 अन्वये प्रदान केली आहे.

प्रस्तावित फेरबदलाची प्रारुप अधिसूचना मराठी व इंग्रजी भाषेत दै. उद्याचा मराठवाडा व दै. एकमत मध्ये दिनांक 28.08.2021 रोजी तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक 09.09.2021 ते दिनांक 15.09.2021 रोजी पृष्ठ क्रं. 85 व 86 वर प्रसिध्द झालेली आहे.

सदरील अधिसुचना प्रसिध्द झाल्यानंतर विहीत कालावधीत एकही हरकती व सूचना या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

तरी उक्त फेरबदलास अंतिम मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये प्रस्ताव शासनास सादर करणेच्या मंजूरीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयातील सामाजिक न्याय भवन ते ग्यानमाता-बरकत कॉम्पलेक्स रस्ता क्रं. 24 या मुख्य रस्त्याला मिळणारा 15.00 मी. रुंद रस्ता विकसीत करणे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व शहराचा सर्वांगीण विकास लक्षात घेता सुरक्षित व सुरळीत वाहतूकीच्या दृष्टीने शहराच्या मंजुर विकास आराखडयातील प्रस्तावित रस्ते तसेच आस्तित्वातील रस्त्यांचे आवश्यकतेनुसार रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

शहर विकास आराखडयातील नांदेड व वाढीव क्षेत्राच्या महाळजा गाव या शिवेवरुन सामाजिक न्यायभवनच्या पूर्वेकडून ग्यानमाता बरकत कॉम्पलेक्स रस्ता क्रं. 24या मूख्य रस्त्याला मिळणारा विकास आराखडयातील 15.00 मी. रुंद रस्ता विकसीत करणे बाबत परिसरातील नागरीकांची मागणी आहे.

सदर रस्त्याखलील येणारी जमिन ही सामाजिक न्याय भवन तसेच इतर खाजगी मालमत्ताधारकांची असून 15.00 मीटर रुंद व अंदाजे 1.50 कि.मी. लांबीचा सदर रस्ता विकसीत करण्यासाठी जमिनीचे भूसंपादन करुन बाधित मालमत्ता धारकांना जागेचा मावेता म्हणून टिडीआर देवुन जागा संपादित करता येईल.

करिता जागेची भूसंपादन प्रक्रिया अवलंबून रस्ता विकसीत करण्याची कार्यवाही हाती घेण्याच्या प्रस्ताव मान्यतेस्तव महानगरपालिका सर्वसाधारण सभेमोर सादर.

**<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**प्रस्ताव**

**विषय क्रं. 06**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका तर्फे मलामत्ता कर व पाणी कर वसुली काम सुरु असून, शास्ती माफी योजना दिनांक 30 सप्टेंबर 2021 पर्यंत आहे.

कोरोना काळात नागरीकांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झालेला असुन, नागरीकांना पुढील डिसेंबर 2021 शास्ती माफी योजना लाभ देणे यौग्य राहील. शास्ती माफी योजनेची मुद्दतवाढ करुन देऊन अंतिम तारीख दिनांक 31 डिसेंबर 2021 करणे करीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

सुचक :- मुन्तजीबोधीन मुनीरोधीन

अनुमोदक :- स. शेर अली महेबुब अली, स.शोऐब आफाक हुसेन फारुख हुसेन बदवेल, शबाना बेगम मो. नासेर

**स्वाक्षरीत/-**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

Scanned with CamScanner